# Y. C. M. O. U. STUDY CENTRE
## Annual Report (2019-2020)

स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय मालवण या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यास केंद्रावर केंद्रसंयोजक म्हणून जून 2015 पासून प्रा. डॉ. डी. व्ही. हारगिले हे जबाबदारी सांभाळत आहेत. केंद्र स्थापनेपासून या अभ्यास केंद्राच्या विद्यार्थी संख्येत वाढ होत होती. परंतु मागील दोन वर्ष विद्यार्थी संख्येत घट झालेली आहे. या अभ्यास केंद्रात ग्रामीण भागातील जे विद्यार्थी–विद्यार्थीनी तसेच महिला, पुरुष जे शिक्षणापासून वंचित राहिलेले आहेत. तसेच जे आपले काम करुन नियमित शिक्षण घेवू शकत नाहीत. अशी मुले, मुली, महिला व पुरुष आपले काम करुन किंवा नोकरी करुन या अभ्यास केंद्रात शिक्षण घेऊ शकतात.

सन 2019–2020 या शैक्षणिक वर्षामध्ये पूर्वतयारी बी. ए. व बी. कॉम. या वर्गामध्ये एकूण 191 विद्यार्थीनी नाव नोंदणी केली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना आठवडयातून एकदा दर रविवारी मार्गदर्शन केले जाते. वेगवेगळया विषयांचे समंत्रक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. अभ्यासकेंद्रावर नाशिक विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा, म्हणून सहशैक्षणिक उपक्रम राबविले जातात.

**प्रा. डॉ. डी. व्ही. हारगिले**
**केंद्रसंयोजक**
**य. च. म. मु. विद्यापीठ अंतर्गत**
**अभ्यासकेंद्र मालवण (7441 A)**



Scanned with CamScanner

# DEPARTMENT OF LIFELONG LERNING AND EXTENSION
## Annual Report (2019-20)

मुंबई विद्यापीठाचा एक सहशैक्षणिक उपक्रम म्हणून हा विभाग आपल्या महाविद्यालयामध्ये सन 2011–12 पासून सुरु करण्यात आलेला आहे. सध्या या विभागाचे प्रमुख म्हणून डॉ. डी. व्ही. हारगिले काम पाहत आहेत. NSS आणि NCC विभागामध्ये सहभागी नसलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच समाजसेवेत रस आहे असे विद्यार्थी या विभागात सहभागी होतात.

या विभागामार्फत विद्यार्थ्याचा सर्वांगिण विकास करणे, सामाजिक समस्यांची जाणीव करुन देणे, स्त्रियांच्या विविध कौटुंबिक आणि सामाजिक दर्जाची जाणीव करुन देणे, विद्यार्थ्यांमध्ये संशोधन प्रवृत्ती वाढविणे अशा विविध हेतूने विविध उपक्रम राबविले जातात.

या शैक्षणिक वर्षामध्ये T.Y.B. A. – 25, T.Y.B.Com. – 35 व T.Y.B.Sc. 01 असे एकूण 61 विद्यार्थी–विद्यार्थीनींनी या विभागात प्रवेश घेतला आहे. तसेच या 26 विद्यार्थ्यांनी – PEC व 35 विद्यार्थ्यांनी – SWS या प्रकल्पांची निवड केली आहे. या उपक्रमात त्यांनी घरोघरी जाऊन प्रश्नावली भरुन घेतलेली आहे. तसेच काही विद्यार्थ्यांनी मुलाखती घेतलेल्या आहेत आणि त्याच्या आधारावर प्रकल्प केलेला आहे. यातून विद्यार्थ्यांना भावी जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी ज्ञान व विविध व्यक्तींचे गुण जाणून घेता आले. त्यांना त्यांचा भविष्यासाठी चांगला उपयोग होईल.

या विभागाचे प्रथम ट्रेनिंग दि. 18/06/2019 रोजी वैभववाडी येथे झाले व दुसरे ट्रेनिंग दि. 18/02/2019 रोजी साळगाव येथे झाले. तसेच विद्यार्थ्यांना दि. 22/02/2020 रोजी डॉ. सनये सर (क्षेत्र समन्वयक) यांनी दोन्ही प्रकल्पांविषयी विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन केले.



Scanned with CamScanner

# आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग










Scanned with CamScanner

विदयार्थ्यांचे नाव :- श्रद्धा विश्वनाथ लोणे

कॉलेजचे नाव :- स.का.पाटिल सिंधुदुर्ग महाविदयालय मालवण

विषय :- आजीवन अध्ययन विस्तार विभाग

प्रकल्पाचे नाव :- शेतकऱ्यांच्या समस्या

रोल नंबर :- 9

वर्ग :- T.Y.B.A

मार्गदर्शक शिक्षक :- हारगिले सर

Scanned with CamScanner

# प्रस्तावना

शेती ही फार पुरातन काळापासुन चालत आलेली आहे. तिचा उगम आदिमानवाच्या विचारातून झाला. भारतात जास्तीत जास्त लोक ग्रामीण भागात शेती करतात. आपल्या भारतात पूर्वीपासुन सखोल शेती केली जाते. म्हणून भारताला कृषी प्रधान देश म्हटले जातात.

महाराष्ट्र देशातच नव्हे तर जगातील 193 देशांत आघाडीवर असल्याचा दावा महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांकडून केला जातो. परंतू आर्थिक पाहणी अहवालाने त्याचा फोलपणा उघड केलाय. चालू वर्षातील आर्थिक वृद्धी दर (7.3%) मागील वर्षाच्या तूलनेत (10%) घसरलाय. कृषी, उदयोग, सेवा अशा सर्वच क्षेत्रांत राज्याची पीछेहाट झालीय. कृषी व संलग्न क्षेत्राचा विकास दर उणे 8.3 टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. एकट्या कृषी क्षेत्रातील ही घट उणे 30.7 टक्के इतकी लक्षणीय आहे.

अपुरा पाऊस (सरासरीच्या 84.3%) असे वरवरचे कारण त्यासाठी शासनाकडून दिले जाते. ऊस वगळता सर्वच पिकांच्या उत्पादनात मोठी घट झालीय. कापसात तर हे प्रमाण 44% आहे. अपुरा पाऊस नव्हे तर गुलाबी बोंडअळी हे या घटीचे कारण असल्याचे स्पष्ट झालेय.

महाराष्ट्रातील शेती विकासासाठी अधिकाधिक शेती सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन दयायची म्हटले की, सर्वप्रथम या मार्गात अडसर येतो तो उसाच्या शेतीचा. शेतकऱ्यांच्या रिकाम्या हातांना उत्पादक काम मिळवून देण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न सुरु करण्याची गरज आहे. तेव्हाच सिमांत अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होईल आणि सर्वसाधारण शेतकऱ्यांना बरे दिवस येतील.

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र | तपशिल |
| --- | --- |
| 1 | प्रस्तावना |
| 2 | शेतकऱ्यांचे मालमत्तेवरील नियंत्रण |
| 3 | शेतीचे महत्व |
| 4 | शेतीचे उद्दिष्टे |
| 5 | सादरीकरण |
| 6 | संदर्भ सूची |
| 7 | मार्गनिर्देशक |


Scanned with CamScanner

# शेतकऱ्याच्या मालमत्ते वरचं नियंत्रण

प्रत्येक शेतकऱ्याची मुख्य मालमत्ता, त्याचे भांडवल म्हणजे त्याची जमीन. पण त्याच्या मालकीच्या या जमिनीची विक्री करण्याचे किंवा ती भाडेपट्टीवर देण्याचे स्वातंत्र्यही शेतकऱ्याला नाही. देशभरात जमीन मालकी नोंदणी अवस्था तर अत्यंत दयनीय आहे. मालकीची शेतजमीन असली तरी शेतकऱ्याला तिचा भांडवल म्हणून उपयोग करता येत नाही. शेतकऱ्याला त्याची जमीन केवळ शेतीसाठी वापरता येते. आणि तो ती केवळ शेतकऱ्यालाच विकू शकतो. आज परिस्थिती अशी आहे की, शेती करणे त्याला लाभदायक तर सोडा शेतकऱ्याला परवडतही नाही. शेतजमीन ही केवळ दुसऱ्या शेतकऱ्यालाच विकत घेण्याची मुभा असल्याने इतर कोणत्या शेतकऱ्याची ना विकत घेण्याची पत असते. ना त्याला त्यात स्वारस्य असते. त्यामुळे बाजारपेठेत शेतकऱ्यांच्या या मालमत्तेला ना भाव असतो ना भांडवल म्हणून त्याच्या मालकीच्या जमिनीचा त्याला वापर करता येतो.

# शेतीची उद्दिष्ट्ये

① चांगल्या प्रतीचे अन्न तयार करणे.

② मृदा व जलसंवर्धन करणे.

③ नैसर्गिक साधन संपत्तीचे रक्षण करणे.

④ शेतात व शेतावर उपलब्ध असलेल्या सुक्ष्मजीवाणू, प्राणी, वनस्पती यांचा अधिक वापर करून निसर्गाचा समतोल राखणे.

⑤ जमिनीची सुपिकता वाढवणे.

⑥ जैविक विविधता टिकवून ठेवण्यास मदत करणे.

⑦ सिंचनाच्या सुविधा वाढवून पाण्याचे प्रदूषण टाळणे.

⑧ पिक पद्धतीमध्ये बदल करावा.

⑨ मिश्र पिक पद्धतीचा वापर करावा.

⑩ पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनावर आधारित मातीचे बंध, नाला बंध, सम पातळीवरील चर, शेततळी, जलकुंड, यासारखे उपचार पद्धतीचा वापर करावा.

Scanned with CamScanner

# शेतीचे महत्त्व

भारत हा कृषीप्रधान देश मानला जातो. भारतातील सुमारे 70 % जनता उदरनिर्वाहासाठी शेती व्यवसायावर अवलंबून आहे. भारतात काम करणारे दोन तृतीयांश लोक शेती अथवा शेती उद्योगांशी संबंधित आहेत. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती व्यवसायाचा वाटा सुमारे 18 ते 20 % इतका आहे. सुमारे 30 % जनता अप्रत्यक्षरीत्या त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा या गरजांसाठी शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून आहे. शेतीच्या एकूण उत्पन्नात भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. अजूनही शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा मोठा घटक आहे. भारताच्या आर्थिक सामाजिक विकासामध्ये ह्या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळे भारताच्या पंचवार्षिक योजनांमध्ये शेतीला नेहमी प्राधान्य देण्यात आले आहे.

शेती उत्पन्नाचा आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र सरकारच्या शेती क्षेत्रासाठीच्या नव्या उपयुक्त योजना व अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे ऑर्गनाईज रिटेल व लॉजीस्टिकच्या क्षेत्रात पदार्पण यामुळे 21 वे शतक हे शेती व्यवसायासाठी सुवर्णसंधीचे आहे. भारतात शेती व्यवसायाला नेहमीच अग्रक्रम दिला गेला आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात शेतीच्या दृष्टीने महत्त्वाच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. या दृष्टीने देशातील बहुसंख्य ग्रामीण विकास बँकांच्या आधुनिकीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. अर्थसंकल्पात शेतीच्या खर्चात गेल्या वर्षाच्या तुलनेत 80 % नी केलेली वाढ खूप महत्त्वाची आहे.

Scanned with CamScanner

# शेती : समस्या आणि उपाय

महाराष्ट्रातील शेती आणि शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत वाईट या सदरात मोडणारी आहे. ही वाईट अवस्था 2014-15 आणि 2015-16 या दोन दुष्काळी वर्षांमुळे निर्माण झालेली आहे. या दोन वर्षांच्या आधी म्हणजेच 2013-14 साली पावसाचे प्रमाण चांगले असणाऱ्या वर्षातही येथे धान्यांचे दर हेक्टरी उत्पादन केवळ 1198 किलो म्हणजेच देशातील सर्वात मोठ्या राज्यांमध्ये किमान असल्याचे नीती आयोगाने दाखवून दिले आहे. थोडक्यात शेती क्षेत्राचे दर हेक्टरी उत्पादन कमी, त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी म्हणून वाढत्या प्रमाणात कर्जबाजारीपणा आणि या दुष्टचक्राचा अंतिम परिणाम आणि म्हणून शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या अशी स्थिती दोन दशकांहूनही जास्त काळ राहिलेली दिसते. 1995 पासून क्राईम ब्युरोने शेतकऱ्यांच्या आत्महत्येची राज्यांगणिक आकडेवारी प्रसिद्ध करायला सुरुवात केली.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करायची असेल तर येथील शेती अधिक उत्पादक करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही पण शेतीक्षेत्रातही उत्पादकता

Scanned with CamScanner

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या बरे दिवस दिसावेत असे राज्यकर्त्यांना वाटत असेल तर पाणी, वीज आणि सडक या तीन सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. शरद जोशी म्हणायचे की सिंचनाची सुविधा निर्माण केली आणि उत्पादनात वाढ झाली म्हणजे शेतमालाच्या किंमती कोसळतात. परंतु मध्यप्रदेशात तसं झाले नाही. कारण धान्याच्या बाजारपेठेत शासनाने हस्तक्षेप केला. तसेच महाराष्ट्रात घडावे म्हणून येथील शेतकऱ्यांच्या कैवाऱ्यांनी राज्य सरकारवर दडपण आणायला हवे.

महाराष्ट्रातील शेती विकासासाठी अधिकाधिक शेती सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन दयायची म्हटले की, सर्वप्रथम या मार्गास जडसर येतो. सुमारे तीन वर्षापूर्वी सत्तास्थानी आलेल्या फडणवीस सरकारने मोठा गाजावाजा करुन जलयुक्त शिवार योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. परंतु या योजनेचा लाभ धरण योजनांप्रमाणे दूरवर पोहचणार नाही. तसेच अशा कामांचे आयुष्मान कमी. तेव्हा राज्यातील अधिकाधिक जमिनीला सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ऊस या पिकाच्या संदर्भात सरकारने शासनाच्या पातळीवर तर शेतकऱ्यांच्या कैवाऱ्यांनी जनजागृतीच्या पातळीवर काम हाती घेण्याची नितांत गरज आहे. परंतु या प्रश्नाला कोणी हात घालण्याची शक्यता दृष्टीपथात नाही.

धान्य उत्पादनाबाबत विचार करायचा तर तांदूळ आणि गहू या तृणधान्यांच्या संदर्भात अधिक उत्पादित वाणे विकसित करण्याचे काम देशाच्या पातळीव

चुटकीसरशी वाढवता येत नाही हेही खरे. १५ वर्षांपूर्वी मध्य प्रदेश राज्यातील शेती क्षेत्राची उत्पादकता महाराष्ट्राप्रमाणे खालावलेली आहे. अशा वेळी तेथे नव्याने सत्तेवर आलेल्या मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मध्य प्रदेश राज्यातील शेतीच्या कुंठित अवस्थे-मागील कारणांचा अचूक वेध घेतला आणि ती दूर करण्यासाठी कंबर कसली. सरकारच्या या धोरणामुळे त्या राज्यातील शेतीक्षेत्राच्या उत्पादनवाढीचा दर १० वर्षे दोन अंकी राहिलेला आहे. त्यामुळे आज त्या राज्यातील दर हेक्टरी उत्पादन सुमारे १६५० किलो एवढे झालेले आहे.

धान्योत्पादनाची पातळी राष्ट्रीय सरासरी पातळीपेक्षा कमी आहे. आणि पंजाब व हरियाणा या राज्यांच्या विचार करता त्यांच्या केवळ ४०% आहे. याचा अर्थ मध्यप्रदेश राज्यातील शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी अजूनही बरेच काही करता येण्यासारखे आहे.

मध्यप्रदेश राज्यसरकारने शेती क्षेत्रातील उत्पादकता आणि उत्पादन यांच्या वाढीसाठी कोणती पावले उचलली आणि त्यांचा उत्पादकता वाढविण्याच्या संदर्भात काय लाभ झाला आहे. याचे सखोल विश्लेषण डॉक्टर अशोक गुलाटी या ख्यातनाम कृषी अर्थतज्ञाने केले आहे. पाणी, वीज आणि सडक या तीन महत्वाच्या बाबी शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी सरकारने दमदार पावले उचलली. परिणामी तेथील शेती क्षेत्रात मोठे परिवर्तन झाले. चौहान यांच्या या कामगिरीवर डॉक्टर गुलाटी एवढे खुश आहेत की त्यांनी उत्तर प्रदेश राज्याची सूत्रे हाती घेतलेल्या आदित्यनाथ योगी यांना शिवमंत्र अनुसरण्याचा सल्ला लेखाद्वारे त्यांनी दिला.

Scanned with CamScanner

झाले आहे. यातील भालाच्या विकासाठी ऊसापेक्षा
अधिक पाणी लागते. त्यामुळे राज्याच्या ३५ जिल्ह्यांपैकी
कोकण किनारपट्टी आणि पूर्व विदर्भातील ३
जिल्ह्यांमध्ये, येथे पाऊस विपुल प्रमाणात पडतो. अशा
सात डोंगराळ जिल्ह्यांमध्ये भालाचे पीक घेणे
शक्य होते.

महाराष्ट्रात पाण्याची तीव्र टंचाई आहे.
राज्यातील जवळपास ५० % भाग दुष्काळप्रवण आहे.
त्यामुळे शेतीला पर्याय म्हणून बऱ्याच ठिकाणी
दुधाच्या व्यवसायाचा विस्तार करणे योग्य ठरेल. त्या
व्यवसायाचा विस्तार करायचा तर दर्जेदार चाऱ्याचा
प्रश्न सोडविणे, दुभत्या गुरांसाठी सकस पशुखाद्य
स्वस्तात उपलब्ध करणे, गुरांना चांगली पशुवैद्यकीय
सुविधा मिळावी यासाठी अमूल डेरीच्या धर्तीवर
चोख व्यवस्था करणे आणि शेतकऱ्यांनी उत्पादन
केलेल्या दुधाचे संकलन करण्याची कार्यक्षमता यंत्रणा
उभी करणे या गोष्टींचे अग्रक्रमाने कराव्या लागतात.

महाराष्ट्रात पाण्याची तीव्र टंचाई आहे.
चांगली पशु वैद्यकीय सुविधा ही प्रशिक्षण व
कार्यक्रम कर्मचारी यावर अवलंबून असते. प्रोत्साहनपर
बोनस दिल्यास अशा सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी
मदत होऊ शकेल. विदर्भ आणि मराठवाडा या विभागात
दुधाचे संकलन करण्यासाठी राष्ट्रीय डेरी डेवलपमेंट
बोर्डाची मदत घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला
आहे, अशी बातमी नुकतीच वर्तमानपत्रात झळकली
होती. म्हणजे दुग्धव्यवसायाचा विकास करण्याचे काम या
सरकारच्या कार्यक्रम पत्रिकेवर आहे असे दिसते. तेव्हा
आपण या निर्णयाचे स्वागत करूया.

Scanned with CamScanner

# शेतकरी आत्महत्या थांबवण्याची शक्यता कितपत :-

भारतात १२.५६ कोटी मध्यम व छोटे शेतकरी आहेत. त्यांच्याकडे सरासरी जास्तीत जास्त जमीन दोन हेक्टर आहे. बहुतेक शेतकरी भुसार पिके काढतात. कोरडवाहू शेती करतात. सरासरी शेतकऱ्याचा उत्पादन खर्च 10 हजार रुपये होतो. त्याचे सरासरी उत्पन्न 20,400 रुपये होते. म्हणजे वर्षाकाठी त्याला सुमारे 10 हजार रुपये खर्चायला मिळतात. त्यामध्ये त्याने शिक्षण आरोग्य, लग्न, सण, करमणूक इ. गोष्टी सांभाळाव्यात.

मशागत पेरणी, कापणी, बी-बियाणं, खत, जंतुनाशक इ. साठी पैसे लागतात. घर चालवताना जीव मेटाकुटीला येतो, पैसे उरत नाही. कर्ज घ्यावे लागते. सहकारी बँक, शेती बँक, कमर्शियल बँक कर्ज देते. कर्ज मिळण्यात अडचणी येतात. अनेकांकडे तारण नसते. अनेकांचे आधीचे कर्ज थकलेले असते. बँकांच्या अटी अव्यावहारिक असतात. बँक म्हणते की फक्त उत्पादनासाठीच कर्ज देणार. शेतकरी म्हणतो, की त्याला उत्पादनासाठीच कर्ज देणार. शेतकरी म्हणतो की त्याला जगण्यासाठीही पैसे

शेळ्या व मेंढ्या पालन, कुक्कुटपालन, रेशीम-किडे जोपसना, मधुमाक्षिका पालन असे विविध व्यवसाय ग्रामीण भागात संघटित करता येतील. अशा रितीने गावोगावच्या सिमांत अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या रिकाम्या हातांना उत्पादक रोजगार मिळवून देण्यासाठी शासनाने प्रयत्न करायला हवा.

Scanned with CamScanner

हवेत, शिक्षणासाठी, लग्नासाठी पैसे हवेत. बँकांच्या नियमात ते बसेलच असं नाही. नाना अडचणी पार करुन शेतकरी कर्ज घेतात. रिझर्व्ह बँकेची आकडेवारी सांगते, की 12 कोटी शेतकऱ्यांपैकी 5 कोटी शेतकऱ्यांची कमर्शियल सरकारी बँकांत खाती आहेत, 30% शेतकरी सरकारी बँकांत खाती आहेत.

अर्ध्यापेक्षा अधिक शेतकरी कर्जबाजारी आहेत. त्यांच्यावर सरासरी 47 हजार रुपयांचं कर्ज आहे. शेती करुन कसंबसं जगलं तरीही पैसे उरत नाही म्हटल्यावर कर्ज फेडणार कसं? आत्महत्या होते.

पन्नासेक कोटी माणसं जगण्या मरण्याच्या संकटात आहेत. त्यातून वाट कशी निघणार?

देशभरची राज्य आणि केंद्र सरकार शेतकऱ्यांना सुखी करण्यासाठी अनेक योजना जाहिर करतात. त्यांचा परिणाम होताना दिसत नाही. महाराष्ट्र सरकारनं 2017 साली कर्जमाफी केल्यानंतर आत्महत्यांचा आकडा पुढच्या वर्षी 1755 वरुन 2761 वर गेला.

Scanned with CamScanner

अशा अचानक येणाऱ्या अनेक संकटांचा सामना करावा लागतो, हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतातील पिकांचे नुकसान होते. हजारी रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याच्या कष्टाला दरवेळी फळ मिळनेच असे नाही. तसेच शेतकऱ्यांसमोर हमीभावाची समस्या आहे.

Scanned with CamScanner

# शेतकऱ्यांना लागणाऱ्या मूलभूत गोष्टी :-

शेतकऱ्याला शेती करण्यासाठी लागणाऱ्या गोष्टींमध्ये प्रथम "सुपीक जमीन आणि नंतर पाणी" लागते. शेतीला मुबलक पाणी असेल तरच शेती करणे शक्य आहे. तिसरी आवश्यक गोष्ट म्हणजे "मनुष्यबळ." हे असले की शेतकरी शेतातील पिकांची निगा राखू शकतो. चौथे म्हणजे शेती करताना येणारा खर्च पूर्ण करण्यासाठी लागणारा पैसा आणि शेवटी जेथे तो त्याचा उत्पादित शेतमाल विकतो, ती "बाजारपेठ शेतकऱ्यांसाठी त्याची शेतीत सर्व काही असते. त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि जगातील अन्य उद्योग करणारे लोक हे कळत न कळत या शेतकऱ्यावर अवलंबून असतात.

शेतकऱ्यावर येणारी संकटे शेती करताना शेतकऱ्याला बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकारकडून किंवा बँक इ. कडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, नियमितीतील होणारे शासकीय बदल

# ऋणनिर्देशक

शेतकऱ्यांच्या समस्या हा प्रकल्प मी निवडलेला आहे. या प्रकल्पातील माहितीचे सादरीकरण मला हारगिले सर यांच्याकडून मिळालेले आहे.

Scanned with CamScanner

# संदर्भ सुची

या प्रकल्पातून आपल्याला शेतकऱ्यांच्या समस्या लक्षात येतात. तसेच शेती आपल्यासाठी किती आवश्यक आहे हे आपल्याला या सादर केलेल्या प्रकल्पावरून दिसून. तसेच या प्रकल्पात सादर केलेली माहिती ही इंटरनेट वरून मिळवलेली आहे.

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

# २०२५ पर्यंत भारताला आत्महत्यामुक्त बनवायचंय!

वार्ताहर

मालवण

जीवनात आशा आहे, या वाक्याने आपण एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचवू शकतो. २०२५ पर्यंत भारताला आत्महत्या मुक्त बनवायचं आहे. त्यामुळे आत्महत्या रोखण्याच्या या अभियानात युवकांचे सहकार्य आवश्यक आहे, असे प्रतिपादन आयझॅक अग्रवाल यांनी येथील स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालयात केले.

किंगिंग युथ फाऊंडेशन, मुंबई यांचा आएयपीएस (इंडिया स्युसाईड प्रिव्हेंशनल स्वॉड) यांच्यावतीने स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालयात आत्महत्या रोखण्यासाठीच्या जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अग्रवाल बोलत होते. प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष सुधीर धुरी, वैशाली शंकरदास आदी उपस्थित होते. अग्रवाल म्हणाले, आयपीएस अभियानांतर्गत २०२३ पर्यंत आपल्याला ५० लाख स्वयंसेवक बनवायचे आहेत. हे स्वयंसेवक आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीस ओळखू शकतील. ओळखणे, वाचविणे, घेऊन जाणे या प्रक्रियेतून एखाद्या आमहत्या करणाऱ्या व्यक्तीला डॉक्टरकडे नेऊन तिचा जीव वाचवता येऊ शकतो. मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांना हे ट्रेनिंग देण्यात आले आहे. आतापर्यंत देशातील अनेक मुलांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

लोकमत

# आत्महत्या रोखण्यासाठी युवकांचे योगदान हवे

लोकमत न्यूज नेटवर्क

**मालवण :** 'जीवनामध्ये आशा आहे' या वाक्याने आपण एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचवू शकतो. २०२५ पर्यंत भारत देशाला आत्महत्या मुक्त बनवायचे आहे. त्यामुळे आत्महत्या रोखण्याच्या या अभियानात युवकांचे सहकार्य आवश्यक आहे, असे प्रतिपादन आयजॅक अग्रवाल यांनी केले.

किंगींग युथ फाऊंडेशन मुंबई यांचा आएयपीएस (इंडिया सुसाईट प्रिव्हेंशनल स्वॉड) यांच्यावतीने स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालयात आत्महत्या रोखण्यासाठीच्या जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रायार्य डॉ. श्रीरंग मंडले, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष सुधीर धुरी, वैशाली शंकरदास आदी उपस्थित होते.

आयझॉक अग्रवाल म्हणाले, आयपीएस अभियानांतर्गत २०२३ पर्यंत आपल्याला ५० लाख स्वयंसेवक बनवायचे आहेत. हे स्वयंसेवक आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीस ओळखू शकतील. ओळखणे, वाचवणे, घेऊन जाणे या प्रकियेतून एखाद्या आमहत्या करणाऱ्या व्यक्तीला डॉक्टरकडे नेऊन त्या व्यक्तीचा जीव वाचवता येऊ शकतो. मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण देण्यात आले आहे. आतापर्यंत भारतातील अनेक मुलांना देण्यात आले आहे. मालवणमधील शाळा, महाविद्यालयातील २ हजार मुलांना हे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

Hello Sindhudurg
Page No. 1 Jul 19, 2019
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner



मालवण : स.का.पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना आयझॅक अग्रवाल.

# स.का.पाटील महाविद्यालयात 'आत्महत्या रोखणे' कार्यक्रम

**मालवण (वार्ताहर) :** भारत देशाला २०२५ पर्यंत आत्महत्यामुक्त बनवायचे आहे. त्यामुळे आत्महत्या रोखण्याच्या या अभियानात युवकांचे सहकार्य आवश्यक आहे.जीवनामध्ये आशा आहे, जीवन अनमोल आहे या वाक्याने आपण एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचवू शकतो, असे प्रतिपादन आयझॅक अग्रवाल यांनी स.का.पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालयात केले. किंगीग युथ फाऊंडेशन मुंबई यांचा आएयपीएस (इंडिया सुसाइड प्रिव्हेंशनल स्वॉड) यांच्यावतीने स.का. पाटील महाविद्यालयात आत्महत्या रोखण्यासाठीच्या जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयझॅक अग्रवाल बोलत होते.प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष सुधीर धुरी, वैशाली शंकरदास आदी उपस्थित होते.

आयझॅक अग्रवाल म्हणाले, आयपीएस अभियानांतर्गत २०२३ पर्यंत आपल्याला ५० लाख स्वयंसेवक बनवायचे आहेत. हे स्वयंसेवक आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीस ओळखू शकतील. ओळखणे, वाचवणे, घेऊन जाणे या प्रकियेतून एखाद्या आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीला डॉक्टरकडे नेऊन त्या व्यक्तीचा जीव वाचवता येऊ शकतो. मुंबईतील पोलिस कर्मचाऱ्यांना हे ट्रेनिंग देण्यात आले आहे. मालवणमधीलही शाळा, महाविद्यालयातील २००० मुलांना हे ट्रेनिंग देण्यात आले असल्याचे अग्रवाल म्हणाले.

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

- Celebration of Republic Day
- Celebration of Sadbhavana Day
- Celebration of Constitution Day
- Celebration of National Harmony Day
- Food arraign distribution to food affected people at Devbaug.
- Slogam Competition on National integrity.

- **Residencial Camp :-**
- Venue – Kandalgaon, Malvan
- Duration 08th Jan. to 14th Jan. 2020.
- Volunteer's – 75

- **Activities during the Camp :-**
- Cleanliness
- Environment conservation
- Swachhata Abhiyaan
- Socia – economic Survey
- Health & Hygiene awareness

**Participation of NSS Volunteers in NSS Camps :-**

**1) Utkarsh Camp, Kudal**

i) Gauri Apkar

ii) Pankaj Kavatkar

**2) NRD/SRD Camp Kudal**

i) Usha Yamkar

ii) Virochan Bhoi



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

## On the Spot Painting - Third

सहभागी विद्यार्थी - कु. प्रविण धर्मान्ना नडगेरी - F.Y.B.A

## Mehendi Designing - Third

सहभागी विद्यार्थी - कु.तस्मीया बरकत खान - T.Y.B.Com

## Collage - Consolation ( उत्तेजनार्थ )

सहभागी विद्यार्थी - अजय आप्पा आळवे - S.Y.B.Com

या व्यतिरिक्तही बाकी सर्व स्पर्धा प्रकारांत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले उत्कृष्ट योगदान दिले. युवा सेनेच्या वतीने दिनांक ०५ फेब्रुवारी ते ०८ फेब्रुवारी, २०२० या दरम्यान महाविद्यालयीन स्तरीय आमदार चषक युवा महोत्सव स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. आमच्या स.का.पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवणकडील पुढील विद्यार्थी व विद्यार्थीनी या स्पर्धेतील विविध स्पर्धामध्ये सहभागी झाले होते.



Scanned with CamScanner

**१. एकांकिका कलाकार**

१. कु. वैभव आनंद वळंजू

२. कु. प्रथमेश रत्नाकर सामंत

३. कु. श्रीरंग सत्यवान करवडकर

४. कु. जान्हवी विजय बिरमोळे

५. कु. स्नेहा विजय चव्हाण

**२. गायन**

१. कु. भक्ती तळवडेकर

२. कु. दिव्या देसाई

३. कु. सरिता यमकर

४. कु. प्रणाली परब

५. कु. ऋतू गोवेकर

६. कु. प्रथमेश सामंत

**३ रॅम्प वॉक**

१. कु. सुविधा गावडे

२. कु. दुर्गेश गावकर

३. कु. साहिल कुबल

४. कु. गोपाल बागवे

५. कु. ऋतू गोवेकर

६. कु. भाग्यश्री मांजरेकर

### ४ समूहनृत्य कलाकार

१. कु. प्रथमेश नारायण चव्हाण

२. कु. यशश्री गणेश वरक

३. कु. भक्ती महेंद्र तळवडेकर

४. कु. प्रतीक्षा प्रकाश पेंडुरकर

५. कु. भावना सुनिल करलकर

६. कु. कविता दिगंबर धुरी

७. कु. ओंकार गंगाधर मालवणकर

८. कु. अक्षय साहेबराव कदम

९. कु. साहिल अरविंद राऊळ

१०.कु. भूषण भास्कर सोळंके

### ५ काव्यवाचन

१. कु. अजय आळवे

२. कु. दुर्गेश गावकर

३. कु. वैभव वळंजू

४. कु. प्रथमेश सामंत

### ६ मिमिक्री

१. कु. वैभव आनंद वळंजू



Scanned with CamScanner

युवा सेनेच्या वतीने दिनांक 05 ते 08 फेब्रुवारी, 2020 या दरम्यान कुडाळ व मालवण तालुका मर्यादित आमदार चषक युवा महोत्सव मध्ये सर्वाधिक बक्षिसे मिळवून आमदार मान. नगराध्यक्ष व इतर मान्यवर यांच्याकडून आमदार चषक स्विकारताना महाविद्यालयाची सांस्कृतिक विभाग टीम.





आमदार चषक युवा महोत्सव मध्ये सर्वाधिक बक्षिसे मिळविल्यानंतर जल्लोष करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी.

Scanned with CamScanner

ा युवा सेनेच्या वतीने मालवण कुडाळ तालुक्यातील कॉलेज स्तरावर आयोजित आमदार वैभव नाईक चषक युवा महोत्सव स्पर्धेत सर्वाधिक पारितोषिके पटकावत सिंधुदुर्ग महाविद्यालय मालवण आमदार चषकावर नाव कोरले. विजेतेपद मिळवल्यानंतर विद्यार्थ्यांनी मोठा जल्लोष केला. आमच्या महाविद्यालयातील पुढील विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी या स्पर्धेत यश संपादन केले.

## सर्वसाधारण विजेतेपद

**एकांकिका कलाकार**

१. कु. वैभव आनंद वळंजू

२. कु. प्रथमेश रत्नाकर सामंत

३. कु. श्रीरंग सत्यवान करवडकर

४. कु. जान्हवी विजय बिरमोळे

५. कु. स्नेहा विजय चव्हाण

अभिनंदन

**प्रथम क्रमांक**

**एकांकिका निर्वासित**

स.का.पाटील.सिंधुदुर्ग महाविद्यालय मालवण.

**पुरूष अभिनय - प्रथम**

निर्वासित.कु. वैभव आनंद वळंजू

**उत्तेजनार्थ**

निर्वासित.कु. श्रीरंग सत्यवान करवडकर

**नेपथ्य - प्रथम**

निर्वासित.कु. देवेन राजेंद्र कोळंबकर

**प्रकाश योजना - प्रथम**

निर्वासित.सत्येंद्र दळवी.



Scanned with CamScanner

**स्त्री अभिनय - प्रथम**

निर्वासित. कु. जान्हवी विजय बिरमोळे

**तृतीय**

निर्वासित. कु.स्नेहा विजय चव्हाण

**मिमिक्री**

तृतीय - कु.वैभव वळंजू

# अभिनंदन

**रॅम्पवॉक**

मिस्टर युथ आयकॉन - कु.दुर्गेश गावकर

मिस युथ आयकॉन - ऋतू गोवेकर

**काव्य वाचन - द्वितीय**

कु.वैभव वळंजू

**उत्तेजनार्थ**

कु.दुर्गेश गावकर

**समूह नृत्य - प्रथम**

कलाकार

१. कु.प्रथमेश नारायण चव्हाण

२. कु.यशश्री गणेश वरक

३. कु.भक्ती महेंद्र तळवडेकर

४. कु.प्रतीक्षा प्रकाश पेंडुरकर

५. कु.भावना सुनिल करलकर

६. कु.कविता दिगंबर धुरी

७. कु.ओंकार गंगाधर मालवणकर

८. कु.अक्षय साहेबराव कदम

९. कु.साहिल अरविंद राऊळ

१०.कु.भूषण भास्कर सोळंकं



Scanned with CamScanner